Vol 7 Issue 5 June 2017

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences,
University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldisrj.lbp.world**

ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651(UIF)

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

VOLUME - 7 | ISSUE - 5 | JUNE - 2017

# विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांचे शिक्षण गोष्टी रूपाने कसे शिकविता येईल ?




Sandhya Nadgouda
Researcher , Tilak Mahashtra Vidhyapeeth Pune.

*प्रस्तावना :*

आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने एवढी प्रगती केली आहे की आज मानव मंगळावर राहण्यास जाण्यास तयारी करीत आहे . बदलत्या काळाबरोबर सर्वच क्षेत्रात एवढे बदल झाले की ते स्विकारणे अपरीहार्य असल्यामुळे स्पर्धेत धावर्णाया व डोळयावर झापड लावलेल्या घोडयाप्रमाणे आपली अवस्था झालेली आहे . धावर्णाया या स्पर्धेमध्ये पळून पळून आपली दमछाक होईल मात्र ही जीवघेणी स्पर्धा व त्याचे स्वरूप दिवसेंदिवस वाढतच आहे .

लहान लहान खेळण्या बागडण्याच्या वयात मुले मोठमोठया आव्हानांना सामोरे जाताना दिसतात . जेव्हा दूरदर्शन वरील विविध वाहिन्यांवरील विविध स्पर्धा जसे की गायन नृत्य वादन आपण पाहतो तेव्हा एवढया लहान वयात ही मुले आपले जगणे खेळणे सोडून स्पर्धेत उतरलेली आहेत असे दिसून येते आणि विशेष म्हणजे पालकच या सर्व गोष्टींना कारणीभूत आहेत . पालक समाज शाळा यांनी निरोगी सुदृढ व निकोप पिढी घडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत . मुलांमध्ये स्पर्धा द्वेश इर्षा उत्पन्न न करता सामंजस्य निरागसता व आनंदी वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे . मुले विद्यार्थी कुठे तरी चांगले विचार चांगले आचार वर्तणूक या पासून दूर होत चाललेली दिसतात . मुलांवर योग्य चांगले विचार संस्कार बिंबवीणे आवश्यक आहे . तरच योग्य मुल्यांची रूजवणूक ही लहानपणापासूनच घरातून व शाळांमधून होणे आवश्यक आहे .

माझ्या आता पर्यतच्या प्राथमिक माध्यमिक पूर्वप्राथमिक उच्च माध्यमिक सर्व स्तरांवरील अनुभवांनूसार गोष्ट हा सर्वांचाच आवडीचा विषय आहे असे वाटते . इतकेच नव्हे तर अबाल वृध्दांपर्यंत गोष्ट सर्वांनाच आवडते . गोष्टीच्या माध्यमातून आपण मुलांवर चांगले संस्कार रूजवू शकतो . मूल्यांची रूजवण करू शकतो ती पुढील प्रमाणे...




शिक्षण ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अंत्यत महत्वाची प्रकिया होय . आचार विचार कौशल्य ज्ञान आणि नैतिक मूल्यांद्वारे सकारात्मक बदल घडवून आणणे या प्रकियेत अभिप्रेत आहे . शिक्षणाद्वारे परिपूर्ण माणूस घडविला जावा हे त्याचे अंतिम उद्दिष्ट आहे . चांगले सुदृढ आणि संपन्न व्यक्तिमत्व घडविण्याच्या या प्रकियेत पुस्तकी शिक्षणावरोबर कौशल्य व व्यवहार उपयोगी जीवनोपयोगी शिक्षण आचार विचारांचे शिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे . कारण परिपूर्ण व्यक्तीविकासावरच पर्यायाने समाजविकास व राष्ट्रविकास अवलंबून आहे . सध्याच्या शिक्षणाचा विचार केला तर चित्र असे दिसते...

शालेय महाविद्यालयीन अभ्यासक्रमांतून विद्यार्थी विविध विषयांचे ज्ञान माहिती आत्मसात करतील पण त्याला खर्या अर्थाने माणूस म्हणून तयार करण्यासाठी ते पुरेसे ठरेलच असे नाही . त्यासाठी त्याला नैतिक मूल्यांचे शिक्षण देणे आवश्यक ठरेल . कारण आजचे शिक्षण वाचणे लिहणे आकडेमोड या पुरतेच मर्यादित आहे . त्यातून विकसित बुध्दी तयार होते पण मन मात्र अविकसितच राहते . त्यातूनच आज वैयक्तिक कौटुंबिक भावनिक व सामाजिक समस्या निर्माण होत आहेत . विकसित मन तयार करणे हेच खरे आव्हान आजच्या शिक्षण व्यवस्थेपुढे आहे हे स्पष्ट जाणवते . अशा प्रकारच्या नैतिक मूल्य शिक्षणाची गरज सुरूवातीपासूनच शिक्षणतज्ञांनी व्यक्त केली असली तरी याची प्रभावी व योग्य अंमलबजावणी झालेली नाही . त्यासाठी शिक्षण असे असावे नैतिक मूल्यात्मक सांस्कृतिक वैज्ञानिक दृष्टीकोन तांत्रिक ज्ञानात्मक आर्थिक सामाजिक भावनिक ही खरी उणीव .

मूल्यशिक्षण ही आजच्या काळाची गरज आहे . भावी पिढी सुजाण सुसंस्कृत योग्य क्षमतेची बनविण्यासाठी मूल्यशिक्षणाचे महत्व आपल्या लक्षात आले आहे . जून १९९६ पासून मूल्यशिक्षण हे महाराष्ट्र शासनाने शालेय स्तरावर अनिवार्य केले . त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होऊन ८ ते १० वर्षे उलटून गेली तरी त्याचे परिणाम स्पष्टपणे जाणवत नाहीत हा प्रश्न आहे . हे मूल्यशिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत “प्रभावीपणे पोहचविण्याचा त्याच्या रूजविण्याचा” अर्थात ही जबाबदारी आम्हां शिक्षकांवरच आहे .

खरे तर मूल्यशिक्षणाची सुरूवात स्वतः पासून व कुटुंबापासून होते . व्यक्तीच्या भावनिक व नैतिक विकासाचा श्रीगणेशा कौटुंबिक जीवनातच व त्याच्या माता पित्याकडून होतो . म्हणूनच जुन्याकाळी गोष्टी सांगणारी आजी खर्या अर्थाने मूल्यशिक्षण देत होती . पुढचे शिक्षण अर्थातच शिक्षणसंस्थेचे . शाळा ही मूल्यशिक्षणाची प्रयोगभूमी

आहे . त्यासाठी शिक्षकांनी विशिष्ट उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत 'मूल्यसंस्कार' पोहोचविण्याचा प्रयत्न करावयास हवा . नैतिक मूल्ये ही दिसत नाहीत पाहता येत नाहीत दाखविताही येत नाहीत . व्यक्ती काय बोलते व काय करते यावरून अनुमान करावे लागते .

मूल्यशिक्षण देताना हे करा ते करू नका असे सांगण्यापेक्षा त्याचे फायदे सांगितले काही चांगला आदर्श त्यांच्या समोर ठेवून मांडण्याचा प्रयत्न करावा लागेल . तात्त्विक भूमिकेतूत काही शिकविण्याचा प्रयत्न केला उपदेशाचे डोस पाजले की ते पचनी पडत नाहीत . त्यापेक्षा विशेष करून गोष्टीरूपाने काही सांगितले त्यातला तोटा दाखविला तर त्याचा चांगला परिणाम दिसून येईल . कारण मुलांना गोष्टीमध्ये अधिक रूची असते . गोष्टीतून ऐकलेले वाचलेले मुले आचरणात आणण्याचा प्रयत्न करतील . हे काम केवळ शिक्षकापुरते मर्यादित न राहता पालक कुटुंब यांनाही करता येण्यासारखे आहे .

## नैतिक मूल्यांचे शिक्षण गोष्टीरूपाने असे शिकविता येईल :

१ . सध्या शालेय स्तरावर मूल्यशिक्षणासाठी स्वतंत्र तासिका आहेतच . त्यावेळी छोटया गोष्टी सांगून त्यातील मर्म विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देता येईल .
२ . शिक्षकांनी गोष्ट सांगण्यावरोवरच विद्यार्थ्यांमध्ये गोष्टी सांगण्याची स्पर्धा घेता येईल .
३ . घरातील आई वडील इतर कुटुंबीय यांनीही फावल्या वेळेत मुलांना असे उपक्रम करण्यास प्रेरणा दयावी . त्यातून त्याचे मनोरंजन ही होईल आणि मूल्यात्मक असे सहज शिक्षण ही त्यांना मिळू शकेल .
४ . अभ्यासक्रमातील पाठयपुस्तकातील गोष्टी आदर्श व्यक्तींची चरित्रे माहिती महत्वाच्या सामाजिक व सांस्कृतिक घटना गोष्टींच्या रूपाने सांगितल्या तर विद्यार्थ्यांच्या त्या सहज पचनी पडतील .
५ . उपदेशात्मक शिकवणीवजा त्यांचे स्वरूप न ठेवता मुलांना रस वाटेल आवडेल अशा पध्दतीने गोष्टी सांगता येतील .
६ . घटना प्रसंग घडामोडी यावर आधारित बोधकथा तयार करून त्यातील 'मूल्य' विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देता येईल .

गोष्टी रूपाने मूल्यांचे शिक्षण देताना त्यात थोरामोटयांचा आदर मानसन्मान सहकार्याची भावना बंधुभाव प्रेम आपल्या राष्ट्राविषयी भाषेविषयी समाज व संस्कृतीविषयी स्वाभिमन सत्य व न्यायाने वागणे सकारात्मक दृष्टीकोन प्रामाणिकपणा चिकाटी आत्मविश्वास यांसारख्या कितीतरी गोष्टींचा विचार करता येईल . हे विचार विद्यार्थी गोष्टींद्वारे आत्मसात करतील . त्यासाठी विद्यार्थ्यांची मानसिकता लक्षात घेऊन त्यांना काय हवे याचाही विचार व्हावा . नैतिक मूल्यांचे शिक्षण देताना आजच्या प्रगत तंत्रज्ञानाचा आधार घेता येईल .

## आणखी काही उपक्रम :

१ . काही ऑडिओ कॅसेटसद्वारे चांगल्या गोष्टी विद्यार्थ्यांनां ऐकविता येतील .
२ . व्ही . सी . डी . च्या द्वारे मूल्यात्मक संस्कार देर्णाया फिल्म दाखविता येतील .
३ . संगणक इंटरनेटचा वापर करून चांगला मजकूर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविता येईल .
४ . पोस्टर्स निबंध भित्तिपत्रक वकृत्व या प्रकारच्या स्पर्धा आयोजित करता येतील . मूल्यात्मक शिकवण देणारे विषय देऊन त्यांना सहभागी करून घेता येईल .
५ . 'सकाळ' वर्तमान पत्रातून प्रसिध्द होणारी बालमित्र ही पुरवणी 'सुटीचे पान' हे सदर यांची कात्रणे करून त्यातील बोधकथा गोष्टी मुलांकडून संकलित करून त्याचाही वापर करता येईल .

अर्थात आपण सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीत मुलांना तथ्य वाटले पाहिजे . त्यासाठी 'बोले तैसे चाले' ही वृत्ती शिक्षकांना व पालकांना जोपासावी लागेल . आजच्या भयावह परिस्थितीतून भावी पिढीला वाचविण्यासाठी त्यांना योग्य दिशेने घेऊन जाण्यासाठी त्यांना सक्षम करण्यासाठी 'मूल्यशिक्षण' अत्यंत गरजेचे ठरेल .

'असा होता पूर्वीचा काळ
गुरूगृही शिकत होता बाळ
संस्काराचं बीज येथेच रूजायचं
निरोगी 'रोपटं' तरारून यायचं
रामकृष्ण आणि शूर शिवाजी
गोष्टी सांगे प्रेमळ आजी'

'गोष्टी सांगणारी प्रेमळ आजी' आज नाही . तिची उणीव आम्हां शिक्षकांना पालकांना भरून काढावी लागेल . कारण वैचारिक तात्त्विक भूमिकेतून कितीही ज्ञान माहिती विद्यार्थ्यांनी आत्मसात केली तरी भावनिक आणि नैतिक शिक्षणाची उणीव राहणारच आहे . त्यासाठी 'गोष्टी रूपाने मूल्यशिक्षण' हा उत्तम पर्याय वाटतो .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.oldisrj.lbp.world